# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १४७-२२ दिनांक :- २५/०५/२०२२

## दुकानाचे पत्रे उचकटुन कॉपर चोरी करणाऱ्यास अटक करुन चोरीस गेलेला २ लाख रुपयांचा पुर्ण मुद्देमाल हस्तगत-वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेची कामगीरी.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०६/०५/२०२२ रोजी रात्री २१.०० वा पासुन ते १३/०५/२०२२ रोजी सकाळचे ९.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी यांच्या नायगाव येथील इलेक्ट्रीक दुकानाला लावलेले सिमेंटचे पत्रे उचकटुन तळ मजल्यामध्ये ठेवलेल्या पॉलीकॅप कंपनीची कॉपर वायर असा एकूण ०१,९६,२४५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल घरफोडी करुन चोरी नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. I ५१३/२०२२ भा.दं.वि.सं.१८६० चा अधिनियम कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासकामी वालीव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळावरुन तांत्रीक पुरावे हस्तगत करुन व गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे चोरी करणारे व चोरीचा माल विकत घेणारे आरोपीत नामे. १) रसुलन खातुन ऊर्फ रुबी तस्लीम अन्सारी वय- ३० वर्षे रा. तुंगारेश्वर रोड, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर. २) सुरेश नाथुलाल पटेल वय- २२ वर्षे, रा. मौर्या नाका, सातिवली, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक १९/५/२०२२ रोजी अटक करुन गुन्हयातील ०१,९६,२४५/- रुपये किंमतीचा माल व गुन्हयात वापरण्यात आलेली ९५,०००/- रुपये किंमतीची सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोटार सायकल असा एकुण ०२,९१,२४५/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

वरील कामगीरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, राजेंद्र फड पोना. सचिन दोरकर, सतिष गांगुर्डे, पो.अंम. गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.